महाराष्ट्र शासन

# भारतीय प्रशासकिय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नागपूर

जूने मॉरिस कॉलेज परिसर, सिव्हिल लाईन, सिताबर्डी, नागपूर ४४० ००१

दूरध्वनी क्रमांक ०७१२-२५६५६२६ फॅक्स क्रमांक ०७१२-२५६५६२६

E-Mail directoriasngp@rediffmail.com Web site-preiasnagpur.org.in

**नागरी सेवा - भाप्रसे/भविसे/भापुसे इ. प्रारंभिक परीक्षेकरीता प्रशिक्षण कार्यक्रम -२०१८**

केंद्रीय लोक सेवा आयोगाच्या (UPSC) नागरी सेवा परिक्षा - २०१८ च्या पूर्व प्रशिक्षणासाठी विनामूल्य प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नागपूर प्रवेशासाठी रविवार दिनांक ०५/११/२०१७ रोजी प्रवेश परिक्षा (सीईटी) घेतली जाणार आहे.

१. **प्रवेश क्षमता :-** एकुण १२०

१. भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण संस्था, नागपूर - १००

२. अल्पसंख्याक आयोग द्वारा अनुदानीत - १०

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (BARTI) द्वारा अनुदानीत - १०

**२. प्रवेश परिक्षा पध्दत :** - प्रवेश पूर्व परीक्षा एकूण २०० गुणांची असेल. त्यात Section-I सामान्य अध्ययन, १०० गुणांचा असेल व Section-II बुध्दीमापन चाचणी (सीसॅट) १०० गुणांचा असेल. युपीएससी, नागरी सेवा परीक्षा २०१७ नुसार गुणवत्ता यादी Section-I, सामान्य अध्ययन या भागातील मिळणा-या गुणावर आधारीत असेल. त्या करीता Section-II सी सॅट या भागामध्ये (Qualifying Marks) किमान ३३% गुण म्हणजे ३३ गुण असणे अनिवार्य आहे. नागरी सेवा परिक्षा-२०१६ च्या अभ्यासक्रमावर आधारीत येथील प्रवेश पुर्व परीक्षा असेल प्रवेश परीक्षा **वस्तुनिष्ठ स्वरूपाची राहील. तसेच प्रत्येक चुकीच्या उत्तराला, मार्कांच्या १/३ (०.३३%) एवढे मार्क कमी करण्यात येतील.**

**परीक्षेची वेळ :** दुपारी ११.०० ते १.०० (दोन तास)

**३. प्रवेश परीक्षा अर्हता** **अ.** कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण

**ब.** वय १ ऑगस्ट २०१८ रोजी पूर्ण
i. वय २१ ते ३२ वर्ष (खुला संवर्ग)
ii. वय २१ ते ३५ वर्ष (इ.मा.व./वि.मा.व./भ.ज. ब,क,ड/वि.जा.)
iii. वय २१ ते ३७ वर्ष (अनु.जाती/जमाती)

**क.** उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असला पहिजे (Domicile of Maharashtra Certificate)

**किंवा**

शासन निर्णय क्र. रा.प्र.व्य.१०९८/(१७१/९८)म.शि-१ दिनांक २४.०४.२००० नुसार उमेदवार, महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील रहिवाशी असल्यास त्याचा/तीच्या अर्जात तो/ती पात्रता परिक्षा महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील निर्देशित गाव किंवा शहारातील संस्थेमधून उत्तीर्ण झाल्याचे नमूद करणे आवश्यक असेल. तसेच अर्जासोबत संबंधित विद्यार्थ्या/विद्यार्थीनीचे पालक महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील रहिवाशी असल्याचे जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र आणि उमेदवार; पात्रता परिक्षा संस्थेतून उत्तिर्ण झाल्याचे व त्याची/तिची मातृभाषा मराठी असल्याबाबतचे संस्थेच्या प्राचार्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच १० वी ची परिक्षा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

ड. प्री-आय.ए.एस. ट्रेनिंग सेंटरच्या प्रारंभिक अथवा मुख्य परीक्षा प्रशिक्षण सत्राचा लाभ घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेस बसता येणार नाही.

इ. संस्थेच्या संपूर्ण प्रशिक्षण काळात उमेदवारास नौकरी अथवा इतर अभ्यासक्रमात सहभाग घेता येणार नाही.

४ **परीक्षेसंबंधित महत्वाची माहिती :**

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रीया कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | **ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा कालावधी** | **०५/०९/२०१७ ते ०४/१०/२०१७** |
| २ | **भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखे मध्ये विहित चलनाद्वारे प्रवेश परिक्षा शुल्क जमा करण्याचा कालावधी** | **०७/०९/२०१७ ते ०७/१०/२०१७** |
| ३ | **लेखी परिक्षेसाठी प्रवेश पत्र उपलब्ध होण्याचा कालावधी** | **२३/१०/२०१७ ते ०५/११/२०१७** |

**परिक्षा ऑनलाईन अर्ज www.preiasnagpur.org.in या संकेतस्थळावर दिनांक ०५.०९.२०१७ पासून उपलब्ध होतील.**

i) **प्रवेश अर्ज शुल्क** :- रू. ३००/- खुला संवर्गकरीता व रू. १५०/- अनु.जाती/जमाती,/इ.मा.व./वि.मा.व/भ.ज.ब,क, व ड/वि.जा./वि.मा.प्र. संवर्गाकरीता

ii) www.preiasnagpur.org.in या बेवसाईटवर परिक्षेसंबंधी सर्व सुचना , माहितीपत्रक, अभ्यासक्रम उपलब्ध होईल. सदर माहिती पोस्टाने पाठविण्यात येणार नाही.

iii) . उमेदवाराने ऑनलाईनच अर्ज भरावा. तसेच उमेदवाराने आपले ओळखपत्र ऑनलाईन प्राप्त करून घ्यावे, अर्ज व कोणतेही शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयात पाठविण्यात येवू नये. प्रमाणपत्रे अंतिम निवड प्रक्रीयेमध्ये तपासण्यात येतील.

**५.** संस्थेतील प्रवेश व मर्यादित वसतिगृह प्रवेश उपलब्धतेनुसार गुणवत्ता व प्रचलीत शासन निर्णय नियमांच्या नुसार प्रवेश देण्यात येतील.

**६. सुचना** – प्रवेश परिक्षेला बसणा-या विद्यार्थ्यांनी मोबाईल फोन, माहिती तंत्रज्ञान साधने जवळ बाळगु नयेत.

**७.** प्रवेश परिक्षेची प्रश्न पत्रिका इंग्रजी भाषेत असेल.

**ठिकाण :- नागपूर**
**दिनांक :- २९.०८.२०१७**

**(डॉ. प्रमोद के लाखे)**
**प्र. संचालक**
**भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र,**
**नागपूर**